**<u>पुणे महानगरपालिकेच्या कामा करिता</u>**

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका
दिनांक :८/८/२०२३

पुणे महानगरपालिका
✷ सूचना ✷
( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे परिशिष्ठ भाग २ मधील
नियम क्रं.१ (एच) अन्वये)
**कार्यपत्रिका क्रमांक – ६**
**<u>(खास सभा)</u>**

**<u>पुणे महानगरपालिकेची विशेष (खास) सभा शुक्रवार,दि.११/८/२०२३</u>** रोजी **<u>दुपारी ०३.३० ( तीन वाजून तीस मिनिटे )</u>** वाजता **<u>महापालिका आयुक्त कार्यालयात</u>** भरेल.

**मा.महापालिका आयुक्त तथा प्रशासक, पुणे महानगरपालिका यांचे निर्णयार्थ खालीलप्रमाणे विषय सादर करण्यात येत आहेत.**

<u>विषय क्र.१२७</u>

संदर्भ – १) उप सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्रमांक पीआरडी–३३२०/प्र.क्र.१७/नवि–७, दिनांक ०४ मे २०२१.
२) मा.महामेट्रो विभागाकडील पत्र जा.क्र.२४०, दि.१३/१२/२०२२
३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प्रकल्प/ ३९३, दि. ३/८/२०२३ चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.४६०, दि.४/८/२०२३

----

पुणे मेट्रो प्रकल्पाच्या ( टप्पा क्र.२ ) विस्तारीत मेट्रो मार्गिकेच्या (वनाज ते चांदणी चौक व रामवाडी ते वाघोली – विठ्ठलवाडी ) सविस्तर प्रकल्प अहवालास व सदरच्या प्रकल्पासाठी पुणे महानगरपालिकेचे जमिनीसाठीचे योगदान र.रू.२४ लाख महामेट्रोस अदा करणेसाठीच्या खालील बाबींस मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) पुणे मेट्रो प्रकल्पाच्या ( टप्पा क्र.२ ) विस्तारीत मेट्रो मार्गिकेच्या वनाज ते चांदणी चौक (१.१२२ कि.मी.) व (२) रामवाडी ते वाघोली ( विठ्ठलवाडी ) ( ११.६३३ कि.मी.) या दोन मार्गिकांचा एकूण १२.७५५ कि.मी.सविस्तर प्रकल्प अहवालास.

२) पुणे मेट्रो प्रकल्पाच्या ( टप्पा क्र.२ ) विस्तारीत मेट्रो मार्गिकांचे काम महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि.यांचेमार्फत राबविणेस.

३) वनाज ते चांदणी चौक व रामवाडी ते वाघोली ( विठ्ठलवाडी ) या विस्तारीत मेट्रो मार्गिकांच्या प्रकल्पासाठी मे.राज्य शासन / मे.केंद्र शासन यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर पुणे महानगरपालिकेचे जमिनीसाठीचे योगदान र.रू.२४.०० लाख इतकी रक्कम महामेट्रो यांना अदा करणेस व त्याकरिता आवश्यक तो करारनामा महामेट्रो यांचे समवेत करणेस.

४) मे.केंद्र शासन यांचेकडून वनाज ते चांदणी चौक व रामवाडी ते वाघोली ( विठ्ठलवाडी ) या विस्तारीत मेट्रो मार्गिकांच्या प्रकल्पासाठी मान्यता देताना मे.केंद्र शासन / मे.राज्य शासन यांचे आर्थिक सहभागाबाबत कोणताही फेरबदल झाल्यास त्याबाबत महामेट्रो व राज्य शासन यांचे स्तरावर निर्णय घेणेस.

५) सदर प्रकल्प राबविणेसाठी केंद्र सरकार व राज्य सरकार यांचेकडून उचलण्यात येणाऱ्या कर्ज रकमेची कोणत्याही स्वरूपाची हमी पुणे महानगरपालिकेमार्फत दिली जाणार नाही.

६) सदर प्रकल्प राबविणेकरिता मे.केंद्र शासन व मे.राज्य शासन यांचेकडे आवश्यक तो पाठपुरावा महामेट्रो यांनी त्यांचे स्तरावर करणेस.

७) वनाज ते चांदणी चौक व रामवाडी ते वाघोली ( विठ्ठलवाडी ) या विस्तारीत मेट्रो मार्गिका व त्यावरील मेट्रो स्टेशन बांधकाम विकास विभागामार्फत पुणे शहराच्या विकास आराखडयामध्ये दर्शविणेस.

<u>विषय क्र.१२८</u>

संदर्भ – १) उप सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्रमांक पीआरडी–३३२०/प्र.क्र.१७/नवि–७, दिनांक ०४ मे २०२१.

२) मा.महामेट्रो विभागाकडील दि.९/१/२०२३ रोजीचे पत्र.

३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प्रकल्प/ ३९६, दि. ४/८/२०२३ चे पत्र.

४) मा.स्थायी समिती ठराव क्र.४६३, दि.४/८/२०२३

-----

पुणे मेट्रो प्रकल्पाच्या ( टप्पा क्र.२ ) विस्तारीत मेट्रो मार्गिकेच्या ( खराडी–हडपसर–स्वारगेट–खडकवासला व पौड फाटा – वारजे– माणिक बाग) सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता मिळणेस व प्रकल्प राबविणेस पुणे महानगरपालिकेची २०९.४१ चौ.मी. तात्पुरत्या स्वरूपात व २२९९.१७ चौ.मी. कायमस्वरूपी वापरासाठी जमिन (एकूण मुल्यांकन र.रू. ६.७७ कोटी ) मेट्रोला हस्तांतरीत करणेसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) पुणे मेट्रो प्रकल्पाच्या ( टप्पा क्र.२) विस्तारीत मेट्रो मार्गिकेच्या (१) खराडी – हडपसर – स्वारगेट – खडकवासला ( २५.८६२ कि.मी.) व (२) पौड फाटा – वारजे– माणिकबाग ( ६.११८ कि.मी. ) या दोन मार्गिकांचा एकूण ३१.९८ कि.मी.सविस्तर प्रारूप प्रकल्प अहवालास.

२) पुणे मेट्रो प्रकल्पाच्या ( टप्पा क्र.२) विस्तारीत मेट्रो मार्गिकांचे काम महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि.यांचेमार्फत राबविणेस.

३) खराडी–हडपसर–स्वारगेट–खडकवासला व पौड फाटा – वारजे– माणिक बाग या विस्तारीत मेट्रो मार्गिकांच्या प्रकल्पासाठी मे.राज्य शासन /मे.केंद्र शासन यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर पुणे महानगरपालिकेची २०९.४१ चौ.मी.तात्पुरत्या स्वरूपात व २२९९.१७ चौ.मी.कायमस्वरूपी वापरासाठी जमिन ( एकूण मुल्यांकन र.रू.६.७७ कोटी ) मेट्रोला हस्तांतरीत करणेस व त्याकरिता आवश्यक तो करारनामा मालमत्ता व व्यवस्थापन विभागामार्फत महा मेट्रो यांचे समवेत करणेस.

४) मे.केंद्र शासन यांचेकडून खराडी–हडपसर–स्वारगेट–खडकवासला व पौड फाटा – वारजे– माणिक बाग या विस्तारीत मेट्रो मार्गिकांच्या प्रकल्पासाठी मान्यता देताना मे.केंद्र शासन / मे.राज्य शासन यांचे आर्थिक सहभागाबाबत कोणताही फेरबदल झाल्यास त्याबाबत महामेट्रो व राज्य शासन यांचे स्तरावर निर्णय घेणेस.

५) सदर प्रकल्प राबविणेसाठी केंद्र सरकार व राज्य सरकार यांचेकडून उचलण्यात येणाऱ्या कर्ज रकमेची कोणत्याही स्वरूपाची हमी पुणे महानगरपालिकेमार्फत दिली जाणार नाही.

६) सदर प्रकल्प राबविणेकरिता मे.केंद्र शासन व मे.राज्य शासन यांचेकडे आवश्यक तो पाठपुरावा महामेट्रो यांनी त्यांचे स्तरावर करणेस.

७) खराडी–हडपसर–स्वारगेट–खडकवासला व पौड फाटा – वारजे– माणिक बाग या विस्तारीत मेट्रो मार्गिका व त्यावरील मेट्रो स्टेशन इ.बाबी बांधकाम विकास विभागामार्फत पुणे शहराच्या विकास आराखडयामध्ये दर्शविणेस.

**मा.महापालिका आयुक्त तथा प्रशासक, यांचे आज्ञेवरुन**

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर पुणे ४११००५
दिनांक :–८/८/२०२३

**योगिता भोसले ,**
**प्र.नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**

**(टिप :–प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) मा.नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**